# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

अपील क्रमांक : १३८०/२०२२

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. राजेश नवलकिशोर ठाकूर, विशाखा निवास, अजय नगर, अंबाझरी हिल टॉप, नागपूर-३३ | ग्रामसेवक, ग्राम पंचायत, बोरखेडी(रेल्वे), ता.जि. नागपूर | विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १४.११.२०२४**

१. उपस्थिती –

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| उपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित | अनुपस्थित |

२. व्दितीय अपील अर्ज –

(१) **व्दितीय अपील अर्जाचा दिनांक** : २३.०५.२०२२

(२) **व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** : २३.०५.२०२२

(३) **व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे** : मा. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०४.०४.२०२२ प्रथम अपील अर्ज जोडपत्र ब सादर केले होते. त्यानुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९.०५.२०२२ रोजी प्रथम अपिलाचे सुनावणी घेउन सदर अपिलान्वये दि. १०.०५.२०२२ रोजी जनमाहिती अधिकारी यांना माहिती देणेबाबत कालावधी १० दिवसात आदेशित केलेले होते. तरीसुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम-२००५ कायद्यानुसार विहित मुदतीत व आजपर्यंत आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानुसार अद्यापर्यंत कुठलिही माहिती दिलेली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारीच्या आदेशाची अवहेलना केलेली असून कायदेशीर दोषी आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०९.०५.२०२२ रोजी अपूर्ण माहिती दिली आहे.

(४) **व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती** : जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ कायद्याच्या तरतुदीनुसार मला विहित मुदतीत माहिती दिलेली नसून, त्यांचेवर माहितीचा अधिकार अधिनियम मधील कलम २० (१), १९(८) (ग) आणि कलम २० (२) नुसार कायदेशीर कारवाई करावी. तसेच या संदर्भातील इतर तीन मुद्दांमध्ये विनंती केली आहे.

**माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०५.०३.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०३.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : वर्ष- २०१९ ते आजपर्यंत

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : ग्रामपंचायम बोरखेडी (रेल्वे) हद्दीतील बांधकामाविषयी मुद्देनिहाय माहिती मागितली आहे.

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : उपलब्ध नाही

**३. प्रथम अपील —**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : ०४.०४.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०५.०४.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत व आजपर्यंत माहिती दिली नसून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील ७ (१) चा भंग केले असून कायदेशीर दोषी आहे. कारण जनमाहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत परिपूर्ण माहिती आजपर्यंत दिलेली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी कायदेशीर दोषी आहेत.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, (पंचा), नागपूर यांनी दि.१०.०५.२०२२ रोजी सुनावणी आयोजित केली. १) अपिलार्थी श्री. राजेश एन. ठाकूर यांना जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे) यांनी विहीत मुदतीत मागितलेली माहिती दिली नसल्याने त्यांनी माहितीच्या अधिकारातील कलम ७ (१) चा भंग केलेला आहे. २) उत्तरवादी तथा जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे) यांना सुचित करण्यात येते की, अपिलार्थी श्री. राजेश एन. ठाकूर यांना आदेश प्राप्त झाल्याच्या दिनाकांपासून १० दिवसामध्ये मागितलेली माहिती मोफत देण्यात यावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा. ३) उत्तरवादी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे) यांना माहितीच्या अधिकार अधिनियम २००५ कलम ४ (१) नुसार आपले कार्यालयीन काम करतांना काटेकोरपणे अमंलबजावणी करण्याच्या सुचना देण्यात येत आहे व इतर ती मुद्यांत निर्णय पारित केले.

**४. युक्तीवाद/लेखी खुलासा** —आज सुनावणीस अपिलार्थी उपस्थित असून, जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी यांची सार्वजनिक विधानसभा निवडणूक कामकाजासाठी नियुक्ती झाली असल्याने सुनावणीस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले असून पुढील तारीख देण्याची विनंती केली आहे. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे) यांनी माहिती अर्जावर कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यानुषंगाने प्रथम अपिल अर्जावर दि. ०९.०५.२०२२ रोजी सुनावणी घेण्यात आली. प्रथम अपिल अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती मोफत देण्याचे आदेशित केले. जनमाहिती अधिकारी यांनी दि. ९.०५.२०२२ रोजी अपिलार्थी यांना माहिती दिली. परंतु अपिलार्थी यांनी प्राप्त झालेली माहिती अपूर्ण असल्याचा आक्षेप नोंदविला आहे. अपिलार्थी यांना मागितलेल्या माहितीपैकी कामाचे मोजमाप पुस्तिका अप्राप्त असल्याने ती देण्याची विनंती केली आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

५. **निष्कर्ष** — सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

**१)** जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना विहीत मुदतीत प्रतिसाद दिला नसल्याचे दिसून येते.

**२)** अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील उपलब्ध कालावधीचे मोजमाप पुस्तिकाची माहिती देण्यात यावी.

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**अंतरिम आदेश**

१) जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०५.०३.२०२२ रोजीच्या माहिती अर्जान्वये मागितलेल्या माहिती संदर्भात नोंदणीकृत पोचदेय डाकेने पत्र पाठवून उपलब्ध कागदपत्रांच्या समक्ष अवलोकनासाठी १५ दिवसांच्या आतील तारीख व वेळ कळवावी. अवलोकनानंतर अपिलार्थीस त्यातील कागदपत्रांच्या काही प्रती हव्या असल्यास तशी यादी घेऊन ५० पृष्ठापर्यंतची माहिती १५ दिवसात समक्ष/नोंदणीकृत टपालाने नि:शुल्क पुरवावी. त्यापुढील माहितीची पृष्ठे विहित शुल्क आकारुन अपिलार्थीस पुरवावीत. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर अपिलार्थी यांना १५ दिवसांत पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत बोरखेडी (रेल्वे), ता.जि. नागपूर यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३) सदर प्रकरणी आयोगास कोणतीही पुर्वसूचना न देता अथवा पुर्व परवानगी न घेता जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी व्दितीय अपील सुनावणीस अनुपस्थित राहिले असल्याने त्यांच्याविरुध्द सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०१५/प्र.क्र. (२२२/१५) सहा, दि०१/१२/२०१५ नुसार कार्यवाही करण्याचे जनमाहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी याचे कार्यालय प्रमुख यांना प्रस्तावित करण्यात येत आहे.

**(भुपेंद्र गुरव)**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ नागपूर**

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर सत्यमेव जयते ★नागपूर★

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १४.११.२०२४**

**प्रत- गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांना उपरोक्त आदेशातील मुद्दा क्र. ३ च्या अंमलबजावणीसाठी सदर आदेशाची प्रत अग्रेषित करण्यात येत आहे.**

जावक क्र. २२९ दि. 13 JAN 2025

SD-2024/1380-2022/राजेश ठाकूर